आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३० वाजता

१७ सप्टेंबर २०२६ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- युपीआयद्वारे मोठ्या व्यापाऱ्यांना २ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम दिल्यावर आकारल्या जाणाऱ्या शुल्काचा बोजा ग्राहकांवर पडू नये यासाठी केंद्रीय अर्थमंत्रालयाच्या विशेष उपाय योजना

- देशात सेमीकंडक्टर उद्योग वाढत असल्यानं सर्वांसाठी नव्या संधी निर्माणत होत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशात विविध उपक्रमांचं आयोजन

- टाटा सन्सचं अध्यक्षपद आणखी ५ वर्ष एन. चंद्रशेखरन यांच्याकडेच ठेवण्याचा संचालक मंडळाचा निर्णय, टाटा ट्रस्टचा विरोध

**आणि**

- अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या टी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यात भारताची आक्रमक फलंदाजी, अभिषेक शर्माचं ३० चेंडूत शतक

**<><><><><>**

युपीआयद्वारे २ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम वस्तू खरेदीसाठी व्यापाऱ्यांना दिल्यावर लागणाऱ्या शुल्काचा भुर्दंड ग्राहकांना द्यावा लागणार नाही याकडे लक्ष देण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्रालय विशेष उपाय योजना करणार आहे. या अंतर्गत युपीआय सुविधा पुरवणाऱ्या विविध कंपन्या आणि इतर संबंधितांसोबत अर्थमंत्रालयानं चर्चा सुरू केली आहे. या शुल्काची वसुली ग्राहकांकडून करू नये असं NPCI नं यापूर्वीच स्पष्ट केलंय. तसंच ही शुल्क वसुली ग्राहकांकडून होणार नाही याकडे लक्ष देण्याचे आदेश केंद्र सरकारनं बँकांना दिले आहेत.

युपीआय द्वारे होणाऱ्या व्यवहारांवर MDR लादल्यानं रोखीनं होणाऱ्या व्यवहारांचं प्रमाण वाढणार नाही, असा अंदाज केंद्रीय अर्थ मंत्रालयानं व्यक्त केला

आहे. युपीआयद्वारे होणाऱ्या एकूण व्यवहारांमध्ये व्यापाऱ्यांना २ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम देण्याच्या व्यवहारांचं प्रमाण केवळ ४ टक्के आहे, याकडे मंत्रालयानं लक्ष वेधलं आहे. MDR वर जीएसटी द्यावा लागल्यानं महागाई वाढेल ही शक्यताही मंत्रालयानं फेटाळली आहे. ही जीएसटीची रक्कम व्यापाऱ्यांना इनपुट क्रेडिट टॅक्सच्या माध्यमातून परत मिळेल, असं वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

**<><><><><>**

भारतातली सेमीकंडक्टर परिसंस्था वेगाने विस्तारत असून यामधून नवोन्मेष, गुंतवणूक आणि विकासाच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत सेमीकॉन २०२६ परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर बोलत होते.

***होल्ड... बाईट १ - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

यामध्ये उद्योगजगताचं मोठं योगदान असून या यशाचे ते भागीदार आहेत, असं प्रधानमंत्री मोदी म्हणाले. सेमीकंडक्टर क्षेत्रात सरकारनं मोठ्या सुधारणा केल्याचं सांगून, उद्योगजगताला सर्वतोपरी मदत करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावं याकरता अभियांत्रिकीच्या१ लाख विद्यार्थ्यांना सेमीकंडक्टर क्षेत्रात प्रशिक्षण दिलं जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

देशाच्या पुढच्या कित्येक दशकांच्या विकासासाठी सेमीकंडक्टर क्षेत्र अतिशय महत्त्वाचं असून सेमीकॉन योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात सेमीकंडक्टर उद्योगाच्या विकासासाठी ६ स्तंभांच्या आधारे काम करू, अशी माहिती इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

'विकसित भारत- जीराम' योजना, 'विकसित गावांच्या उभारणीत कसं योगदान देऊ शकते, याचा संबंधित अधिकाऱ्यांनी शोध घ्यावा, असे निर्देश केंद्रीय ग्रामविकास, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी दिले

आहेत. ते आज 'विकसित भारत जी-राम-जी' योजनेवर आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेला संबोधित करत होते.

<><><><><>

सीबीएसईच्या शाळांमधे इयत्ता ६वी च्या विद्यार्थ्यांना आगामी शैक्षणिक वर्षापासून दोन भारतीय भाषांसह तीन भाषा अनिवार्य करण्याच्या धोरणाचा फेरविचार करावा असं सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं आहे. सीबीएसईच्या ६ वी ते १० च्या वर्गातल्या विद्यार्थ्यांना त्रिभाषा सूत्र लागू करण्यात आलं असून ७वी ते १०वीच्या वर्गांना पाठ्यपुस्तकं तयार होईपर्यंत त्यातून सूट दिली आहे, तशीच ती ६वीच्या वर्गालाही द्यावी अशी याचिकाकर्त्याची मागणी आहे. त्यावर विचार करावा, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालच्या त्रिसदस्यीय पीठानं सरकारला सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रीय चाचणी संस्थेने डिसेंबर २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीतल्या परीक्षांचं संभाव्य वेळापत्रक जाहीर केलं आहे. या कालावधीत एकूण १४ स्पर्धा परीक्षा घेतल्या जाणार आहेत. यूजीसी नेट परीक्षा १४ ते १९ डिसेंबर दरम्यान घेतली जाईल आणि २० आणि २१ डिसेंबर या तारखा राखीव दिवस असतील. Joint CSIR UGC-NET ही परीक्षा २०-२१ डिसेंबर रोजी घेतली जाईल. अभियांत्रिकी प्रवेशासाठीची जेईई मुख्य परीक्षेची पहिली फेरी २२ ते २४ जानेवारी आणि २८ ते ३० जानेवारी या कालावधीत घेण्यात येईल. तसंच, ३१ जानेवारी ही तारीख राखीव दिवस असेल. या तारखा संभाव्य आहेत आणि प्रशासकीय, शैक्षणिक, वैधानिक, व्यवस्थापकीय किंवा इतर अनपेक्षित कारणांमुळे त्यात बदल होऊ शकतात, असं संस्थेने स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

एकनाथ शिंदे यांच्या आमदारांच्या अपात्रतेची कारवाई प्रलंबित असताना विधिमंडळातलं बहुमत ही चाचणी खात्रीशीर मानली जाऊ शकते का, अशी विचारणा न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी केली. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि व्ही मोहना यांच्या पीठासमोर शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या मान्यतेबाबत निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर आज पुन्हा सुनावणी झाली. शिवसेनेच्या दोन्ही गटांना स्वतंत्र चिन्हांवर निवडणूक लढायला सांगण्याच्या शक्यतेविषयी निवडणूक आयोगाने पुरेसा विचार केला होता का, अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयानं आज केली. निवडणूक आयोगाने दोन्ही गटांना राखीव चिन्ह नाकारण्याच्या शक्यतेचा विचार केला होता का अशी विचारणाही बागची यांनी यावेळी केली. या प्रकरणी पुढची सुनावणी येत्या २२ तारखेला होणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७६व्या वाढदिवसानिमित्त मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, आणि उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशांमधून मोदी यांचं अभिनंदन केलं आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनीही मोदी यांना शुभेच्छा दिल्या आहेत. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही प्रधानमंत्री मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

राज्यात यानिमित्त सेवासंकल्प अभियानाला सुरुवात झाली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी महाराष्ट्र लोकभवनात आशीर्वादाचा दिवा प्रज्वलित केला. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंग यांनी मुंबई आंतरराष्ट्रीय क्रूझ टर्मिनल परिसरात दीपप्रज्वलन सोहळ्यात भाग घेतला होता. यावेळी ते म्हणाले.....

**होल्ड.. बाईट- जितेंद्र सिंग**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे विकसित भारताचं स्वप्न लवकरच साकार करतील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस नागपुरातल्या कार्यक्रमानंतर म्हणाले.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त जगभरातल्या मोठ्या नेत्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. त्यात जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक टेड्रोस घेब्रेयासस, रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन, इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी, इस्राइलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यानू, बौद्ध धर्मगुरू दलाई लामा, विविध देशांचे राजदूत यांच्यासह इतर मान्यवरांचा समावेश आहे.

<><><><><>

टाटा सन्सच्या संचालक मंडळानं विद्यमान अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांची आणखी ५ वर्षांसाठी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करायला मंजुरी दिली आहे. संचालक मंडळाच्या आज मुंबईत झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. २० फेब्रुवारी रोजी विद्यमान कार्यकाळ संपल्यावर या पदावर पुन्हा नियुक्ती न करण्याची विनंती चंद्रशेखरन यांनी गेल्याच महिन्यात संचालक मंडळाला केली होती. मात्र या पदावर कायम राहण्याची संचालक मंडळाची विनंती त्यांनी मान्य केल्याचं टाटा सन्सनं म्हटलं आहे. रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार टाटा सन्सची शेअर बाजारात नोंदणी करायलाही संचालक मंडळानं मान्यता दिली. त्यासाठी रिझर्व्ह बँक, टाटा ट्रस्ट आणि इतरांकडून मार्गदर्शन घेतलं जाणार आहे.

टाटा ट्रस्टनं मात्र चंद्रशेखरन यांच्या पुनर्नियुक्तीला विरोध केला आहे. टाटा सन्सच्या संचालक मंडळाचा हा ठराव बेकायदेशीर असल्याचं ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात नमूद केलंय. टाटा सन्सच्या बैठकीत त्यांनी या ठरावाच्या विरोधात मतदान केलं मात्र बहुमतानं हा ठराव मंजूर झाला.

<><><><><>

अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतानं आक्रमक सुरुवात केली. नवी दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात अफगाणिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. भारताच्या सलामीच्या जोडीनं तडाखेबंद फलंदाजी करत ६ षटकात १०० धावा केल्या. अभिषेक शर्मानं ३० चेंडूत शतक पूर्ण केलं. १०८ धावा करुन तो बाद झाला. त्यानं ११ षटकार आणि ९ चौकार लगावले. मात्र त्याच्यानंतर फलंदाजीसाठी आलेला तिलक वर्मा लवकर बाद झाला. त्यानंतर संजू सॅम्सनही बाद झाला. त्यानं अर्धशतक पूर्ण केलं.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १४ व्या षटकात ३ बाद १६५ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//